मंत्रालयीन सेवा
सर्वहिताय सर्वदा



# महाराष्ट्र शासन

## अल्पसंख्यांक विकास विभाग

दालन क्र. ७१५, मंत्रालय (विस्तार इमारत), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

दूरध्वनी क्र. ०२२ २२८३ ०६२६
मेल आयडी- desk१.mdd-mh@gov.in
संकेतस्थळ : mdd.maharashtra.gov.in

---

अविवि-२०२६/प्र.क्र. २४८/का-५ दि.२१.०७.२०२६

Dr.Ram Rodge Adhyapak Mahavidyalaya,Selu
Inword No.: 159
Date : 28/08/2026.

Shri. Pawan Pawar
Pl inward the circular
28/8/26

प्रति,

१. संचालक, शालेय शिक्षण संचालनालय, पुणे.
२. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.
३. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई
४. संचालक, व्यवसाय शिक्षण संचालनालय, मुंबई
५. संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
६. संचालक, आयुर्वेद संचालनालय, मुंबई.

विषय: अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेश देताना ग्राह्य धरण्यात येणाऱ्या कागदपत्र/पुराव्यांबाबत..

संदर्भ: १) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय क्र.अविवि-२०१०/प्र.क्र.१०९/१०/कार्या-५, दि.०१.०७.२०१३

२) अल्पसंख्याक विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.अविवि-२०१७/प्र.क्र.०४/कार्या-९, दि.१०.०१.२०१७

महोदय,

अल्पसंख्याक विकास विभागाच्या संदर्भ क्र.२ येथील शासन परिपत्रकान्वये राज्यातील मुस्लीम, खिश्चन, शिख, बौध्द, पारसी, जैन व ज्यु यांना धार्मिक अल्पसंख्याक लोकसमूह म्हणून घोषित केले आहे. सदर शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.

२. अल्पसंख्याक विकास विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील दि.०१.०७.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील अल्पसंख्याक दर्जा प्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेश देताना कोणते धार्मिक व भाषिक पुरावे ग्रह्या धरण्यात यावेत. याबाबत राज्यातील सर्व शाळा,

महाविद्यालये, उच्च माध्यमिक, व्यवसायिक व उच्च शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थांना सूचना शालेय शिक्षण विभागाच्या सहमतीने देण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे..

३. पंजाबी साहित्य अकादमीसाठी दि.१८.०७.२०२६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये पंजाबी साहित्य अकादमी श्री.अमरप्रित गुरा, सदस्य यांनी राज्यातील अल्पसंख्याक दर्जा प्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेश देताना कोणते पुरावे ग्रह्या धरण्यात यावेत. याबाबत राज्यातील सर्व शाळा महाविद्यालय, उच्च माध्यमिक, व्यवसायिक व उच्च शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थांना सूचना देण्याची विनंती केली.

४. त्यानुषंगाने कळविण्यात येत आहे की, अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तींना शासनाकडून वैयक्तीक अल्पसंख्याक प्रमाणपत्र/दाखला देण्यात येत नाही. त्यामुळे अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेश देताना विद्यार्थ्यांच्या शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्र/दाखल्यातील धर्म व मातृभाषा विषयीच्या नोंद प्रमाण मानाव्यात व त्यानुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा. विद्यार्थ्यांच्या शाळा सोडल्याच्या दाखला/प्रमाणपत्रात धर्म व मातृभाषेचा उल्लेख नसल्यास अल्पसंख्याक समाजाच्या नोंदणीकृत संघटनेने अथवा धर्म प्रमुखाने दिलेले प्रमाणपत्र उदा.बप्तिस्मा प्रमाणपत्र, दिक्षा प्रमाणपत्र यासह संबंधीत विद्यार्थ्यांच्या पालकाचे धर्म किंवा मातृभाष विषयीचे शपथपत्र यामधील कुठलाही एक पुरावा गृहीत धरुन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा.

५. सन २०२६-२७ शैक्षणिक वर्षामध्ये काही अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकडून वैयक्तीक अल्पसंख्याक प्रमाणपत्र/दाखला याची मागणी अनिवार्य करत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. त्यामुळे कोणत्याही अल्पसंख्याक समुहातील विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही याची नोंद घेण्यात यावी. सदर प्रकरणी त्याबाबत आपल्याशी संबंधीत राज्यातील सर्व अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना सूचना देण्यात याव्यात, ही विनंती.

(आनंदा शेंडगे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत: निवडनस्ती/का.५

"राज्यातील लोकसमूहांपैकी मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, झोराष्ट्रीयन (पारसी), जैन व ज्यु या ७ लोकसमूहांना अल्पसंख्याक लोकसमूह म्हणून दर्जा दिला असल्याची प्रसिध्दी देणेबाबत"

महाराष्ट्र शासन

अल्पसंख्याक विकास विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः अविवि- २०१७/प्र.क्र.४/का-९

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०००३२.

दिनांक:- १० जानेवारी, २०१७.

संदर्भ:- १) महाराष्ट्र शासन राजपत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्र.राअआ २००५/८९/प्र.क्र.१९/२००५/३५, दि. ९ ऑक्टोबर, २००६,

२) महाराष्ट्र शासन राजपत्र, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.विकाक २०१५/प्र.क्र.१७७/का.९, दि. २ जुलै, २०१६,

परिपत्रक

शासनाच्या संदर्भ क्र. १ येथील शासन राजपत्रानुसार राज्यातील लोकसमूहांपैकी मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, झोराष्ट्रीयन (पारसी), व जैन या लोकसमूहांना आणि संदर्भ क्र. २ च्या शासन राजपत्रानुसार ज्यु अशा एकूण ७ लोकसमूहांना "अल्पसंख्याक लोकसमूह" म्हणून घोषित केले आहे.

२. परंतु शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, राज्यातील उपरोक्त ७ लोकसमूहांना "अल्पसंख्याक लोकसमूह" असा दर्जा असल्याची पुरेशी माहिती सर्व संबंधित लोकसमूहातील जनतेला व त्यांच्यासाठी योजना राबविणाऱ्या प्रशासकीय यंत्रणांना देखील नाही. परिणामी, अल्पसंख्याकांसाठी केंद्र शासन व राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजना या लोकसमूहांपर्यंत पोहचण्यास अडचण येत आहे.

३. याव्दारे सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना असे निर्देशित करण्यात येते की, राज्यातील लोकसमूहांपैकी १) मुस्लिम, २) ख्रिश्चन, ३) शीख, ४) बौध्द, ५) झोराष्ट्रीयन (पारसी), ६) जैन व ७) ज्यु या लोकसमूहांना शासनाने अल्पसंख्याक लोकसमूह म्हणून दर्जा दिला असल्याची बाब लक्षात घेवून योजनांची आखणी करण्यात यावी व अल्पसंख्याक लोकसमूहांना त्याचा लाभ होईल याची दक्षता घ्यावी. तसेच आपल्या अख्यारित येणाऱ्या क्षेत्रामध्ये यांस विविध माध्यमाव्दारे प्रसिध्दी देण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०११०१६३८२३९८१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shashikant R Salunkhe

Digitally signed by Shashikant R Salunkhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3f496781d7330d61b41c4ca6211158b72d2ab6bf15878cd9312f9d41519ea160, cn=Shashikant R Salunkhe
Date: 2017.01.10 16:42:35 +05'30'

(श.र.साळुंखे)
कक्ष अधिकारी, **महाराष्ट्र** शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
५. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
६. महालेखापाल १/२ (लेखापरीक्षा) , मुंबई / नागपूर,
७. संबंधित विभागीय आयुक्त, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नाशिक
८. आयुक्त, नगरपालिका प्रशासन, मुंबई,
९. संबंधित जिल्हाधिकारी (सर्व),
१०.आयुक्त, संबंधित महानगरपालिका (सर्व),
११.मुख्याधिकारी, संबंधित नगरपालिका (सर्व),
१२.मा.मंत्री / मा.राज्यमंत्री (अल्पसंख्याक विकास) यांचे खाजगी सचिव,
१३.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१४.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी),
१७. सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, बद्रुद्दीन तय्यबजी मार्ग, मुंबई-०१,
१८.व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्या., जुने जकात घर, २ रा मजला, शहीद भगतसिंग रोड, मुंबई,
१९. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, पत्रपेटी क्र. १९६७, मुंबई-०१,
२०. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, पत्रपेटी क्र. १००३६, मुंबई-०१,
२१. संचालक, अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालय, डॉ.आंबेडकर रोड, पुणे-४११००१,
२२. निवडनस्ती (का.९)

अल्पसंख्याक प्रमाणपत्र / दाखला प्रदान

करणेबाबत....

महाराष्ट्रशासन

अल्पसंख्याक विकास विभाग

शासननिर्णयक्रमांकः अविवि-२०१०/प्र.क्र.१०९/१०/कार्या-५

मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

दिनांक :०१ जुलै २०१३

वाचा-

१) शासननिर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/२०१२/का-५, दि.२७ मे २०१३

प्रस्तावना:-

राज्यातील धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्राप्त शासन अनुदानित तसेच कायम विना अनुदानित शैक्षणिक संस्थांद्वारा राबविण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमात संबंधीत अल्पसंख्यांक उमेदवारांना प्रवेश देतांना अशा उमेदवाराच्या, प्रसंगपरत्वे धार्मिक वा भाषिक संबधतेबाबतचा पुरावा म्हणून कोणती कागदपत्रे ग्राह्य धरण्यात यावीत, तसेच राज्यातील धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तींना वैयक्तिक पातळीवर अल्पसंख्याक प्रमाणपत्र / दाखला देण्यात यावा किंवा कसे, या बाबी शासनाच्या विचाराधीन होत्या.

शासननिर्णय-

राज्यातील धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्राप्त शासन अनुदानित तसेच कायम विना अनुदानित शैक्षणिक संस्थांद्वारा राबविण्यात येत असलेल्या अभ्यासक्रमात संबंधीत अल्पसंख्यांक उमेदवारांना प्रवेश देतांना अशा उमेदवाराच्या, प्रसंगपरत्वे धार्मिक वा भाषिक संबधतेबाबतचा पुरावा म्हणून कोणती कागदपत्रे ग्राह्य धरण्यात यावीत, तसेच राज्यातील धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तींना वैयक्तिक पातळीवर अल्पसंख्याक प्रमाणपत्र / दाखला देण्यात यावा किंवा कसे, याबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

१) राज्यातील धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तींना वैयक्तिक पातळीवर शासनाकडून अल्पसंख्याक प्रमाणपत्र / दाखला देण्यात येणार नाही.

२) राज्यातील सर्व शासन अनुदानित तसेच कायम विना अनुदानित शाळा / शैक्षणिक संस्था यांनी विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना विद्यार्थ्यांच्या धर्म तसेच मातृभाषे विषयी खातरजमा करावी व सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेश निर्गमन उताऱ्यात तसेच शाळा सोडल्याचा दाखला / प्रमाणपत्रात विद्यार्थ्यांच्या धर्म तसेच मातृभाषेविषयी विनिर्दिष्टपणे उल्लेख करावा. या बाबींची खातरजमा करण्यासाठी शाळा / शैक्षणिक संस्था यांनी संबंधित अल्पसंख्याक समाजाच्या संघटनेने किंवा धर्म प्रमुखाने दिलेले प्रमाणपत्र (उदा.बप्तिस्मा प्रमाणपत्र, दिक्षा प्रमाणपत्र इ.) यासह संबंधित विद्यार्थ्यां पालकांचे धर्म किंवा मातृभाषेविषयीचे शपथपत्र, पुरावा म्हणून ग्राह्य धरावा.

३) महाविद्यालये वा उच्च माध्यमिक / व्यावसायिक तसेच उच्च शिक्षण देणा-या इतर तत्सम संस्थानी विद्यार्थ्यांना प्रवेश देताना शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रातील विद्यार्थ्यांच्या धर्म वा मातृभाषेविषयी नोंदी प्रमाण मानाव्यात व त्या आधारे अल्पसंख्याक लोकसमुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा.

४) दरम्यानच्या कालावधीत, शाळा सोडल्याच्या दाखला / प्रमाणपत्रात विद्यार्थ्यांच्या धर्म वा मातृभाषेविषयी उल्लेख करण्यात आलेला नसेल अशा प्रकरणी संबंधित अल्पसंख्याक समाजाच्या नोंदणीकृत संघटनेने अथवा धर्म प्रमुखाने दिलेले प्रमाणपत्र उदा.बप्तिस्मा प्रमाणपत्र, दिक्षा प्रमाणपत्र इ.यांच्यासह संबंधित विद्यार्थ्यां पालकांचे धर्म किंवा मातृभाषेविषयीचे शपथपत्र, पुरावा म्हणून ग्राह्य मानन्यात यावा, व त्या आधारे महाविद्यालये वा उच्च माध्यमिक / व्यावसायिक तसेच उच्च शिक्षण देणाऱ्या इतर तत्सम संस्थांनी अल्पसंख्याक लोकसमुहातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावा. (नमूद केलेले पुराव्यांपैकी कुठलाही एक पुरावा असल्यास गृहीत धरुन प्रवेश द्यावा.)

५) प्रवेश निर्गमित उताऱ्यातील तसेच शाळा सोडल्याचा दाखला / प्रमाणपत्रातील विद्यार्थ्यांच्या धर्म तसेच मातृभाषे विषयीच्या नोंदी आवश्यकतेनुसार इतर प्रसंगीदेखील अल्पसंख्याक असल्याबाबतचा पुरावा म्हणून गृहीत धरण्यात याव्यात.

२. वरील निदेशाचे राज्यातील सर्व शांळा/महाविद्यालये/उच्च माध्यमिक/ व्यवसायिक वा उच्च शिक्षण देणाऱ्या सर्व तत्सम शैक्षणिक संस्था तसेच इतर सर्व संबंधितांनी काटेकोरपणे पालन करावे.

३. हे आदेश, शालेय शिक्षण विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०७०२१६४४०६२४१४असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Thanksy Francis Thekkekara

Digitally signed by Thanksy Francis Thekkekara
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MINORITY DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=MAHARASHTRA, cn=Thanksy Francis Thekkekara
Date: 2013.07.03 15:40:21 +05'30'

(डॉ.टी.एफ.थेक्केकरा)

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, दंत महाविद्यालय इमारत, ४ था मजला, सेंट जार्जेस रुग्णालय आवार, मुंबई - ४००००१.
३. संचालक, आयुर्वेद संचालनालय, दंत महाविद्यालय इमारत, ४ था मजला, सेंट जार्जेस रुग्णालय आवार, मुंबई - ४००००१.
४. संचालक, शालेय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.

५. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.

६. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण, ३ महापालिका मार्ग, मुंबई - ४००००१.

७. संचालक, व्यावसायिक शिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, मुंबई - ४००००१.

८. संचालक, अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.

९. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे - ४११०३०.

१०. खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री / मा.मंत्री (अ.वि.वि.), मंत्रालय, मुंबई.

११. खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री / मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), मंत्रालय, मुंबई.

१२. खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री / मा.मंत्री (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई.

१३. खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री / मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण), मंत्रालय, मुंबई.

१४.सर्व अल्पसंख्याक अनुदानित / विनाअनुदानित शैक्षणिक संस्था, महाराष्ट्र राज्य.

१५.निवडनस्ती